



आकृती ४.१ प्रमुख प्राथमिक व्यवसाय

**आकृती ४.१ मधील नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

१. नकाशात कोणकोणत्या आर्थिक व्यवसायांचे वितरण दाखवले आहे?
२. लाकूडतोड हा व्यवसाय प्रामुख्याने कोणत्या अक्षवृत्तांदरम्यान आढळतो?
३. कोणत्या प्रदेशांत प्राथमिक क्रिया आढळत नाहीत? त्याचे कारण काय असावे?
४. मासेमारी व्यवसाय महासागरांमध्ये विशिष्ट ठिकाणीच का आढळत असावेत?
५. युरोप खंडात कोणकोणत्या आर्थिक क्रिया अधिक आढळतात?
६. समुद्रामध्ये दर्शविलेले खाणकामाचे चिन्ह कोणते उत्पादन दर्शवत असेल?
७. कोणत्या खंडात खाणकाम व्यवसाय आढळत नाही? का?
८. जगातील सर्वांत जास्त मासेमारी कोणत्या महासागरात केली जाते?
९. मकरवृत्ताच्या दक्षिणेकडे कोणकोणत्या प्राथमिक आर्थिक क्रिया केल्या जातात?
१०. आग्नेय आशियातील बेटांच्या समूहावर कोणत्या आर्थिक क्रिया केल्या जातात?
११. चारही गोलार्धांचा विचार करता कोणत्या गोलार्धात शेती व्यवसाय कमी आढळतो?
१२. शेतीक्षेत्राचा अक्षवृत्तीय विस्तार आणि हवामान यांबद्दल टीप लिहा.

## भौगोलिक स्पष्टीकरण

वरील निरीक्षणावरून विविध व्यवसायांच्या वितरणातील फरक तुमच्या लक्षात आले असतील. हे सर्व व्यवसाय निसर्गावर अवलंबून आहेत. यात शिकार, फळे, कंदमुळे गोळा करणे, पशुपालन, शेती, मासेमारी, लाकूडतोड, खाणकाम इत्यादी प्राथमिक आर्थिक क्रिया आहेत.

प्राथमिक व्यवसाय हे नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असतात व या नैसर्गिक साधनसंपत्तीवर तेथील नैसर्गिक घटक व नैसर्गिक आपत्तींचा परिणाम होत असतो.

वाढत्या लोकसंख्येची मागणी पूर्ण करता यावी, मनुष्यबळाला यंत्राची मदत मिळावी इत्यादींसाठी प्राथमिक आर्थिक व्यवसायातही यांत्रिकीकरण झाले आहे.

**करून पहा.**

खालील तक्ता आपल्या वहीत पूर्ण करा. उदाहरणासाठी एक नमुना सोडवून दिला आहे.

**तक्ता क्र.४.१**

| प्राथमिक आर्थिक क्रिया | आवश्यक नैसर्गिक साधनसंपत्ती | परिणाम करणारे घटक | |
|---|---|---|---|
| | | नैसर्गिक | मानवी |
| शेती | जमीन, मृदा, पाणी | जमिनीचा उतार, मृदेची गुणवत्ता, अनुकूल हवामान, पर्जन्याचा नियमितपणा | खते, कीटकनाशके, शेतीसाठी लागणारी यंत्रे |
| पशुपालन | | | |
| मासेमारी | | | |
| खाणकाम | | | |
| लाकूडतोड | | | |
| फळे, कंदमुळे गोळा करणे | | | |

### प्राथमिक व्यवसाय

१. **शिकार –** अन्नासाठी शिकार करणे हा मानवाचा प्राचीन व्यवसाय आहे. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शिकारीमुळे प्राण्यांच्या अनेक प्रजाती नामशेष झाल्या आहेत व काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे जगभर व्यावसायिक शिकारीवर बंदी आहे. तसेच प्राण्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी नवनवीन कायदे करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत काही आदिवासी जमाती त्यांच्या चरितार्थापुरती शिकार करतात.

### वितरण

दक्षिण आफ्रिकेच्या कलहारी वाळवंटातील बुशमेन, विषुववृत्तीय सेल्व्हाज घनदाट जंगलातील पिग्मी, बोरा इंडियन, टुंड्रा प्रदेशातील एस्किमो, अंदमान निकोबारमधील सेंटीनल, जरावा, ओंग इत्यादी आदिम जमाती शिकार करून आपला चरितार्थ चालवतात.

### शोधा पाहू!

आंतरजालाच्या आधारे वन्य जीव (संरक्षण) अधिनियमाविषयी माहिती मिळवा.

**२) फळे–कंदमुळे गोळा करणे :**

### सांगा पाहू ?



आकृती ४.२

१. वरील चित्रे कशाची आहेत ते ओळखा.
२. या वस्तू कशापासून बनवल्या जातात ?
३. या वस्तूंसाठी लागणारा कच्चा माल कोठून मिळविला जातो ?
४. हा कच्चा माल मिळवणाऱ्या व्यवसायास काय म्हणतात ?

### भौगोलिक स्पष्टीकरण

हा व्यवसाय वनांवर आधारित असून जगातील अनेक लोक हा व्यवसाय करतात. वनातील फळे, कंदमुळे, फुले, पाने, औषधी वनस्पती गोळा करून आपला उदरनिर्वाह चालवितात. याशिवाय झाडापासून मिळणारा डिंक, राळ, लाख, मध, मेण इत्यादींसारखे पदार्थही गोळा करतात. उदा. खैरापासून कात मिळवला जातो. या काही पदार्थांना बाजारपेठेत मोठी मागणी असल्याने त्यांचे व्यापारी तत्त्वावर देखील संकलन होते. जगातील सर्व वनप्रदेशांमध्ये फळे–कंदमुळे गोळा करणे हा व्यवसाय चालतो.

विषुववृत्तीय प्रदेशांतील जंगले अत्यंत दाट व सदाहरित असतात. तेथील हवामान दमट, रोगट असते. सरपटणारे प्राणी व कीटक यांचाही उपद्रव तेथे होत असतो. म्हणून या प्रदेशांत विविध वस्तू गोळा करण्याचा व्यवसाय व्यापारी तत्वावर करता येत नाही.

**३) लाकूडतोड :**

### सांगा पाहू?

**आकृती ४.१ या नकाशाचे निरीक्षण करा व त्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

१. मोसमी हवामानाच्या प्रदेशांत लाकूडतोड व्यवसाय कोणत्या प्रदेशांत मोठ्या प्रमाणात केला जातो ?
२. ऑस्ट्रेलियाच्या कोणत्या भागात लाकूडतोड व्यवसाय केला जातो.
३. आफ्रिका खंडाच्या कोणत्या भागात लाकूडतोड व्यवसाय आढळत नाही ? त्याचे कारण काय असावे ?
४. लाकूडतोड व अक्षांश वृत्तांमधील संबंधांवर टीप लिहा.
५. विषुववृत्तीय प्रदेशांत लाकूडतोड व्यवसायाचा व्यापारी तत्त्वावर विकास झालेला नाही.

### जरा प्रयत्न करा.

तक्ता ४.२ आपल्या वहीत पूर्ण करा. उदाहरणादाखल एक नमुना सोडवून दिला आहे.

**तक्ता क्र. ४.२ : जगातील विविध वनांतील लाकूडतोड व्यवसाय**

| वनांचा प्रकार | प्रदेश | वनांची वैशिष्ट्ये | लाकूडतोड व्यवसायाची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| विषुववृत्तीय सदाहरित वने | दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन नदीचे खोरे, आफ्रिका खंडातील कांगो नदीचे खोरे, आफ्रिकेचा पश्चिम किनारा, | • घनदाट वने<br>• एका छोट्या क्षेत्रात अनेक प्रकारच्या वृक्षांच्या जाती.<br>• कठीण लाकूड | • वने दाट असल्याने वनात जाणे अवघड, वाहतुकीच्या समस्या.<br>• पारंपरिक पद्धतीने लाकूडतोड.<br>• एकाच ठिकाणी अनेक प्रकारचे वृक्ष. |

| वनांचा प्रकार | प्रदेश | वनांची वैशिष्ट्ये | लाकूडतोड व्यवसायाची वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| | आग्नेय आशिया, मलेशिया, पापुआ न्यु गिनी | • वनांची दुर्गमता<br>• रोगट हवामान | • व्यवसायिकदृष्ट्या किफायतशीर नाही.<br>• सरपटणारे प्राणी, कीटक यांचा उपद्रव<br>• कठीण लाकूड असल्याने मृदू लाकडाच्या तुलनेत मागणी कमी. |
| उष्ण कटिबंधीय (मान्सून) पानझडी वने | | | |
| समशीतोष्ण कटिबंधातील पानझडी वने | | | |
| समशीतोष्ण कटिबंधीय सूचीपर्णी वने | | | |

**भौगोलिक स्पष्टीकरण**

वनांमध्ये चालणाऱ्या अनेक व्यवसायांपैकी लाकूडतोड हा एक महत्वाचा व्यवसाय आहे. वनस्पतींच्या बदलत्या स्वरूपानुसार आपण पृथ्वीवरील वनप्रदेशांचे वर्गीकरण विविध नैसर्गिक प्रदेशांत करतो.

उष्ण कटिबंधीय सदाहरित वनांतील वृक्षांचे लाकूड अतिशय टणक असते. शिवाय ही वने इतकी घनदाट असतात की, तेथे व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड व्यवसाय विकसित होऊ शकत नाही. उष्ण कटिबंधीय पानझडी किंवा मोसमी हवामान प्रदेशातील वने विरळ असतात. तळाशी अनेक झाडेझुडपे उगवतात. ही वने दाट वस्तीच्या प्रदेशांच्या सान्निध्यात असल्याने या वनातील जमिनी मोठ्या प्रमाणात शेतीखाली आणल्या आहेत. त्यामुळे वने नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे.

सूचीपर्णी वनक्षेत्रात एकाच जातीचे वृक्ष विस्तृत प्रदेशात उगवलेले असतात. हे वृक्ष सरळ उंच वाढतात. ती सदाहरित असतात. या अरण्यातील वृक्ष मऊ लाकडामुळे लाकूडतोड व्यवसायासाठी उपयुक्त आहे. जगात सर्वांत जास्त व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड व्यवसाय सूचीपर्णी वनांत केला जातो.

आज जगात लाकूड विविध कारणांसाठी अतिशय उपयुक्त असल्यामुळे प्रचंड प्रमाणात लाकूडतोड केली जात आहे. त्यामुळे जगातील वनांचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. याचा परिणाम म्हणून पर्यावरणासंबंधीच्या अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

**सांगा पाहू?**

निर्वनीकरणाचा पर्यावरणावर, प्राण्यांवर, पक्ष्यांवर आणि मानवावर कोणता परिणाम होतो याची यादी तयार करा.

**४) मासेमारी : आकृती ४.१ नकाशाचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) ग्रँड बँक मासेमारी क्षेत्र उत्तर अमेरिका खंडाच्या कोणत्या किनाऱ्यावर आहे?

२) युरोप खंडाच्या डॉगर बँक क्षेत्रात मासेमारी मोठ्या प्रमाणात का होत असावी?

३) ऑस्ट्रेलिया खंडात कोणत्या भागात मासेमारीचा विकास झालेला आहे?

४) आफ्रिका खंडाच्या पूर्व किनारपट्टीपेक्षा पश्चिम किनारपट्टीवर मासेमारीची क्षेत्रे का जास्त आहेत?

५) ग्रीनलँडच्या दक्षिण किनारपट्टीवर मासेमारी केली जाते कारण सांगा.

**भौगोलिक स्पष्टीकरण**

मासेमारी या प्राथमिक व्यवसायावर अनेक प्राकृतिक आणि मानवी घटकांचा परिणाम होतो. या व्यवसायाचे सुरुवातीचे स्वरूप उपजीविकेपुरते मर्यादित असले तरी, सद्य:स्थितीत ही एक महत्वाची प्राथमिक क्रिया आहे. विशेषत: किनारपट्टीच्या प्रदेशांत या व्यवसायाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मासेमारी व्यवसायास अनुकूल असणारे घटक :

अ) समुद्राचा असा भाग जो २०० मी. पेक्षा कमी खोल आहे अशा उथळ समुद्रास भूखंड मंच म्हणतात. उदा., वायव्य पॅसिफिक महासागरातील चीनजवळील ओखोत्स्क.

आ) उष्ण व थंड सागरी प्रवाहांचा संगम विशेषत: भूखंड मंचावर होत असल्यास अशा प्रदेशांत प्लवंकांची वाढ मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात माशांची पैदास होते. असे प्रदेश निसर्गत: मासेमारीची क्षेत्रे म्हणून प्रसिद्धीस येतात. उदा. क्युरोशियो उष्णप्रवाह व ओयाशियो थंड प्रवाह जपानजवळ एकत्र येतात. या प्रदेशात मासेमारी व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो.

**मासेमारी व्यवसायावर परिणाम करणारे इतर घटक :**

१. जपान आणि चीनसारख्या काही देशांमध्ये मासेमारीचे पारंपरिक कौशल्य उच्च दर्जाचे आहे, त्यामुळे तेथे हा व्यवसाय जास्त वृद्धिंगत झाला आहे.

२. जमिनीची कमतरता, जास्त लोकसंख्या आणि प्रथिनांचा पुरवठा करणाऱ्या इतर अन्नघटकांची टंचाई यांमुळे बेट स्वरूपातील देशांना मासेमारीवर अवलंबून राहावे लागते. उदा. जपान, फिलिपाइन्स. त्यामुळे येथे हा व्यवसाय परंपरेने आर्थिक व्यवसाय म्हणून विकसित झाला.

३. इतर व्यवसायांची कमतरताही या व्यवसायाच्या वाढीस कारणीभूत आहे.

४. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे हा व्यवसाय वाढीस लागला.

५. दंतूर किनारे उत्तम बंदरांच्या निर्मितीस साहाय्यक ठरतात.

६. उच्च अक्षवृत्तीय प्रदेशामध्ये मासे हा नाशवंत पदार्थ सहज साठवता येतो. उष्ण कटिबंधात मात्र त्यासाठी शीतगृहांची सोय करावी लागते.

७. किनारपट्टीपासून वनप्रदेश जवळ असल्याने जहाजबांधणी व्यवसायासाठी लाकूड सहज प्राप्त होते.

**जरा विचार करा.**

मासेमारी व मत्स्यपालन यांमधील फरक काय?

**५) पशुपालन : आकृती ४.१ नकाशाचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पशुपालन आणि गवताळ कुरणे यांचा सहसंबंध सांगा.

२. पशुपालन व्यवसायाचा विकास सर्वांत कमी कोणत्या खंडात आढळतो?

३. जगातील कोणत्या प्रदेशांमध्ये पशुपालन व शेती एकत्रित होताना दिसते?

४. कोणत्या अक्षवृत्तांदरम्यान पशुपालन होताना दिसत आहे?

५. ३०° उत्तर ते ३०° दक्षिण या अक्षवृत्तांदरम्यान कोणत्या पट्ट्यात पशुपालन विकसित झालेले दिसत नाही? यामागचे कारण काय असावे?

६. ऑस्ट्रेलिया खंडाच्या पूर्व भागात पशुपालन केंद्रित होण्याचे कारण काय असावे?

७. खंडांतर्गत शुष्क हवामानाच्या प्रदेशांत पशुपालन व्यवसाय जास्त प्रमाणात का विकसित झाला असावा?

**भौगोलिक स्पष्टीकरण**

पशुपालन व्यवसायाचे जागतिक वितरण ३०° ते ६०° उत्तर व ३०° ते ५५° दक्षिण अक्षवृत्तादरम्यान झालेले दिसते. या व्यवसायावर हवामानाचा प्रभाव दिसून येतो. उत्तर गोलार्धामध्ये या व्यवसायाचा विकास जास्त झालेला आढळतो.

ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण व उत्तर अमेरिका खंडांतील पशुपालन अत्याधुनिक तंत्र, बाजारपेठ आणि विस्तीर्ण गवताळ कुरणे यांनी प्रभावित झालेले आहे. दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिकेतील पशुपालन उच्च तंत्रज्ञानावर आधारित असून येथे या व्यवसायाचे यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. घनदाट वने, रोगट हवामान, निकृष्ट चारा असणाऱ्या विषुववृत्तीय प्रदेशांत या व्यवसायाचा विकास फारसा झालेला नाही. आकृती ४.१ पाहता असे लक्षात येते की, शेतीखालील प्रदेश आणि पशुपालन यांचे वितरण बऱ्याच प्रदेशात एकत्रित आढळून येते. त्यामुळे हे व्यवसाय एकमेकांना पूरक असल्याचे लक्षात येते.

**शोधा पाहू!**

प्राणीज संसाधनाच्या अति वापरामुळे मानवी जीवन व पर्यावरण यांवर काय परिणाम होतो ते शोधा.

**६) खाणकाम** : आकृती ४.१ नकाशाचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. खाणकाम व्यवसाय उत्तर अमेरिकेच्या मुख्यत: कोणत्या भागात आहे?

२. दक्षिण अमेरिका खंडाच्या कोणत्या किनारपट्टीवर खाणकाम व्यवसाय केंद्रित झालेला आढळतो?

३. इतर सर्व प्राथमिक व्यवसायांशी तुलना करता खाणकामाचा विस्तार अक्षवृत्तांशी निगडित वाटतो का? का?

४. खाणकाम व्यवसायांचे जगातील केंद्रीकरण पाहता तुम्ही त्यांचा संबंध देशाच्या आर्थिक विकासाशी लावू शकता का?

**भौगोलिक स्पष्टीकरण**

मानव खनिजांचा उपयोग प्राचीन काळापासून करत आला आहे. हत्यारे, अवजारे, दागिने, भांडी, औषधे इत्यादी तयार करण्यासाठी खनिजांचा वापर केला जात असे. मानवाच्या सांस्कृतिक उत्क्रांतीचे वेगवेगळे टप्पेही त्याच्या खनिज वापराशी निगडित आहेत. पाषाणयुगाच्या शेवटच्या टप्प्यावर मानवाने भूमिगत खाणकामाचे कौशल्य आत्मसात केले. अनुक्रमे कांस्ययुग, ताम्रयुग, लोहयुग, अणुयुग याप्रमाणे कालखंड खनिजांच्या वापरानुसार अधोरेखित करण्यात आले. या प्राथमिक आर्थिक क्रियेतूनच मानवाची उत्तरोत्तर प्रगती होत गेली आहे. मानवाने समुद्र आणि महासागराच्या तळातूनसुद्धा खनिजतेल आणि नैसर्गिक वायूंचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे.

भूकवचात सापडणारी खनिजे मानव निर्माण करू शकत नाही. पृथ्वीवर खनिजांचे वितरणही असमान आहे. त्यामुळे खाणकाम व्यवसाय पूर्णपणे खनिजांच्या उपलब्धतेवरच अवलंबून असतो. या व्यवसायाच्या विकासाचा अक्षांशाशी थेट संबंध नसतो. एखाद्या ठिकाणी खनिजांची उपलब्धता असली तरीही प्रत्यक्षात खाणकाम व्यवसाय त्या प्रदेशाची भूगर्भरचना, खनिजांचे मूल्य, हवामान, भांडवल, तंत्र, कुशल मजूर पुरवठा इत्यादी घटकांवर अवलंबून असतो. यांत्रिकीकरणामुळे हा व्यवसाय आता मोठ्या प्रमाणावर विकसित झाला आहे. खाणक्षेत्राजवळ खनिजांशी संबंधित अनेक उद्योगधंदे स्थापित होतात. मोठ्या प्रमाणावरील खाणकाम व्यवसायासाठी विकसित वाहतूक व्यवस्था ही महत्त्वाची असते. खाणकाम व्यवसायात वाढ झाली की, उद्योगधंद्याचा विकास होतो. पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासातही वाढ होते.


**शोधा पाहू!**

खाणकाम व्यवसायामुळे वायू, जल, भूमी आणि ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. तुम्ही याचे प्रत्येकी एक उदाहरण शोधा.

### ७) शेती :

**करून पहा.**

अ, आ, इ स्तंभाचे निरीक्षण करून साखळी पूर्ण करा. तसेच 'अ' स्तंभामध्ये चित्रासंबंधीची वैशिष्ट्ये व शेती प्रकार यांचा क्रमांक लिहा.

| अ) चित्रे | आ) वैशिष्ट्ये | इ) शेती प्रकार |
|---|---|---|
| शेती प्रकार क्र .............<br>वैशिष्ट्य क्र .............<br> | अ) • शेतजमिनीचा लहान आकार.<br>• कमीतकमी जागेत जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचा प्रयत्न.<br>• अन्नधान्याच्या उत्पादनास प्राधान्य.<br>• मानवी श्रम व प्राण्यांचा वापर.<br>• चीन, भारत, जपान, कोरिया, श्रीलंका. पूर्व आशिया खंडातील देश.<br>• तांदूळ हे प्रमुख पीक. | क. स्थलांतरित शेती |

| | | |
|---|---|---|
| शेती प्रकार क्र .............. <br> वैशिष्ट्य क्र ............. <br>  | आ) • शेतीचा आकार मोठा <br> • भांडवलाचा, आधुनिक कृषियंत्राचा वापर अधिक <br> • एक पीक पद्धती. <br> • पेरणीपासून काढणीपर्यंतची सर्व कामे यंत्राच्या साहाय्याने केली जातात. <br> • शेती व व्यापारी पशुपालन एकत्रित <br> • हेक्टरी उत्पादन कमी, दरडोई उत्पादन जास्त. <br> • समशीतोष्ण कटिबंधीय गवताळ प्रदेश – स्टेप्स, प्रेअरी, डाऊन्स, पंपाज, व्हेल्ड <br> • गहू, मका ही प्रमुख पिके | ख. उद्यान शेती |
| शेती प्रकार क्र .............. <br> वैशिष्ट्य क्र ............. <br>  | इ) • शेताचा आकार मोठा <br> • भांडवलाधिष्ठित शेती <br> • एक पीक पद्धत शेती <br> • स्थानिक मजुरांमार्फत शेतीची कामे <br> • पिकांची योग्य पद्धतीने प्रक्रिया व प्रतवारी <br> • हेक्टरी उत्पादन कमी, मात्र एकूण उत्पादन जास्त <br> • एकदा लागवड केल्यानंतर १० ते १५ वर्षे उत्पादन <br> • चहा, कॉफी, रबर, कोको, भारतातील केरळ राज्यातील मसाल्याचे मळे, कोकण विभागातील काजूबागा <br> • मलेशिया, भारत, श्रीलंका, कॅरेबियन बेटे, ब्राझील, इंडोनेशिया, फिलीपिन्स, थायलंड, व्हिएतनाम इत्यादी | ग. मंडई शेती |
| शेती प्रकार क्र .............. <br> वैशिष्ट्य क्र ............. <br>  | ई) • शेतीचा आकार खूप लहान <br> • वनांतील भूभागाची शेतीसाठी निवड <br> • वने जाळून जमिनीचा शेतीसाठी वापर <br> • उत्पादन फारच कमी <br> • उत्पादन फक्त दोन ते तीन वर्षेच घेता येते. त्यानंतर पडीक जमीन सोडून दुसऱ्या जागेची निवड, <br> • वनसंपदेचा ऱ्हास, मृदेची धूप. <br> • विषुववृत्तीय प्रदेशांतील वनांखालील जमीन आशिया, आग्नेय आशिया, मध्य व दक्षिण अमेरिका, आफ्रिका इत्यादी | घ. सखोल उदरनिर्वाहक शेती |

| | | |
|---|---|---|
| शेती प्रकार क्र ..............<br>वैशिष्ट्य क्र .............<br> | उ) • आधुनिक शेती प्रकार<br>• शहरी भागातील मागणी पूर्ण करण्यासाठी शहरालगत केली जाते.<br>• मर्यादित शेतजमिनीतून जास्तीत जास्त उत्पादन<br>• भांडवलाचा अधिक वापर.<br>• मानवी श्रमाबरोबर शास्त्रीय ज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर.<br>• सेंद्रिय व रासायनिक खतांचा व जलसिंचनाचा मुक्त वापर.<br>• शहरापासून ट्रकद्वारे एका रात्रीच्या प्रवासाइतक्या दूर अंतरापर्यंत या प्रकारची शेती केली जाते. भाजीपाला, फळे, दूध, अंडी, मांस, मासे इत्यादी.<br>• औद्योगिकीकरण झालेल्या दाट घनतेच्या शहरी भागात उदा. खेडशिवापूर, सासवड येथून पुणे शहरास फळे-फुले, भाजीपाला यांचा होणारा पुरवठा. | ड. मळ्याची शेती |
| शेती प्रकार क्र ..............<br>वैशिष्ट्य क्र .............<br> | ऊ) • फळे-फुले, औषधी वनस्पती, शोभेची झाडे इत्यादी उत्पादने व्यापारी उद्देशाने घेतली जातात.<br>• मनुष्यबळाचा व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.<br>• उष्ण कटिबंधीय, भूमध्य सागरीय व समशीतोष्ण कटिबंधीय हवामानाच्या प्रदेशात | द. विस्तृत व्यापारी धान्य शेती |

**तक्ता क्र.४.३ शेतीचे प्रकार व वैशिष्ट्ये**

**करून पहा.**

वरील चित्र आणि माहितीच्या साहाय्याने शेतीवर परिणाम करणाऱ्या घटकांचे वर्गीकरण प्राकृतिक व मानवी या गटांमध्ये करा.

### भौगोलिक स्पष्टीकरण

जागतिक स्तरावरील शेती व्यवसायाचे वितरण पाहता या व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण आफ्रिका खंडात जास्त आहे. त्या मानाने आशिया खंडात ते कमी आहे. तर युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडांत शेतीक्षेत्र विस्तृत असूनदेखील

या व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण अत्यंत कमी आहे. अर्थात विकसित राष्ट्रांत शेती व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या कमी आहे, तर विकसनशील राष्ट्रांत या व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या जास्त आहे.

शेतीच्या विकासावर अनेक प्राकृतिक व मानवी घटकांचा प्रभाव पडतो. त्यामुळे जगात विविध प्रदेशांत विविध प्रकारची पिके घेतली जातात. त्याचप्रमाणे शेती करण्याच्या विविध पद्‌धतीही पाहावयास मिळतात. शेती या व्यवसायावर मृदा, हवामान, पाणीपुरवठा, इत्यादी प्राकृतिक घटकांचा परिणाम होतो; तर श्रम, बाजारपेठ, भांडवल, वाहतूक, साठवणुकीच्या सोयी, सरकारी धोरण, लोकसंख्या, भूमीचा मालकी हक्क इत्यादी मानवी घटकांचा परिणाम होतो. या घटकांना अनुसरूनच पीकपद्‌धतीमध्ये बदल दिसून येतो. चित्राकृतींच्या साहाय्याने अनेक शेतीप्रकार व त्यांची वैशिष्ट्ये याची आपण माहिती घेतली. काही ठिकाणी शेतीमध्ये ग्रीन हाउस, पॉली हाउस मधूनही आधुनिक पद्‌धतीने उत्पादने घेतली जातात. त्याचबरोबर संकरित बी-बियाणे, खते आणि कीटकनाशकांचा वापर करून उत्पादनवाढीचे प्रयत्न केले जातात.

### जरा विचार करा.

- पॉली हाउस, हरीत गृह यांचा उपयोग विशिष्ट प्रदेशातील वनस्पती इतर प्रदेशात वाढविण्यासाठी केला जातो. असा प्रयोग हिमाच्छादित प्रदेशामध्ये करता येऊ शकतो का?
- या पाठात अभ्यासलेल्या आर्थिक क्रियांशिवाय कोणत्या प्राथमिक आर्थिक क्रिया मानव करत असावा? त्यावर वर्गात चर्चा करा आणि यादी करा.

## स्वाध्याय

**प्र.१. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) उपजीविकेसाठी मुख्यतः वनांतून पदार्थ गोळा करणे
- अ. समशीतोष्ण सूचीपर्णी वने
- आ) समशीतोष्ण पानझडी वने
- इ) उष्ण कटिबंधीय पानझडी वने
- ई) विषुववृत्तीय सदाहरित वने

२) मासेमारी क्षेत्रासाठीची सर्वोत्तम स्थिती
- अ) दंतूर किनारे, उथळ समुद्र, उष्ण हवामान, प्लवकांची वाढ
- आ) उथळ समुद्र, उष्ण-थंड सागरी प्रवाहांचा संगम, प्लवकांची वाढ, थंड हवामान
- इ) भूखंड मंच, प्लवकांची वाढ, मासेमारीचे उत्तम कौशल्य, थंड हवामान
- ई) भूखंड मंच, दंतूर किनारे, प्लवकांची वाढ, थंड हवामान

३) अक्षांशांशी थेट संबंध नसलेला प्राथमिक व्यवसाय
- अ) लाकूडतोड
- आ) मासेमारी
- इ) खाणकाम
- ई) शेती

४) विस्तृत व्यापारी शेतीची वैशिष्ट्ये
- अ) एक पीक पद्‌धती, पाण्याचा वापर, उष्ण कटिबंध, धान्य उत्पादन
- आ) एक पीक पद्‌धती, यंत्राचा वापर, उष्ण कटिबंध, धान्य उत्पादन
- इ) एक पीक पद्‌धती, मानवी श्रमाचा वापर, विषुववृत्त, थायलंड, उद्यान शेती
- ई) एक पीक पद्‌धती, शास्त्रीय ज्ञानाचा वापर, उपोष्ण कटिबंध, कडधान्य उत्पादन

**प्र.२. सांगड घालून साखळी पूर्ण करा:**

| अ | ब | क |
|---|---|---|
| १)सखोल उदरनिर्वाहक शेती | १) डॉगरबँक | १) शेत आकार लहान |
| २)पंपाज गवताळ प्रदेश | २)किनाऱ्यापासून दूर खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे उत्पादन | २) प्रतिकूल परिस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ३)मत्स्यक्षेत्र | ३)तांदूळ | ३) बॉम्बे हाय |
| ४)फळे, कंदमुळे गोळा करणे | ४)घनदाट वने | ४) ईशान्य अटलांटिक महासागर |
| ५)खाणकाम | ५) व्यापारी पशुपालन | ५) द. अमेरिका |

**प्र..३. टिपा लिहा.**

१) मळ्याची शेती

२) मासेमारी व प्राकृतिक घटक

३) व्यापारी तत्त्वावरील लाकूडतोड व्यवसाय

४) शिकार व परिसंस्थेचा ऱ्हास

**प्र.४. भौगोलिक कारणे द्या.**

१) भारतात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो.

२) भारतातील छोटा नागपूर पठारावर खाणकाम व्यवसाय विकसित झाला आहे.

३) कॅनडामध्ये लाकूडतोडीचा विकास झाला आहे.

४) विस्तृत शेती हा व्यापारी शेतीचा प्रकार आहे.

५) उष्ण कटिबंधीय प्रदेशांपेक्षा समशीतोष्ण कटिबंधात लाकूडतोड व्यवसाय मोठ्या प्रमाणात का चालत असावा?

६) शिकारीवर बंदी घालण्यात आली आहे.

**प्र.५. फरक सांगा.**

१) विषुववृत्तीय वनांतील लाकूडतोड व समशीतोष्ण वनातील लाकूडतोड

२) मळ्याची शेती आणि विस्तृत व्यापारी शेती

३) खाणकाम आणि मासेमारी

**प्र.६. सविस्तर उत्तरे लिहा.**

१) व्यापारी मासेमारीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

२) सखोल उदरनिर्वाहक शेतीबद्दल माहिती लिहा.

३) मंडई बागायती शेतीची वैशिष्ट्ये लिहा.

४) जगात पशुपालन होणाऱ्या प्रदेशांबद्दल टीप लिहा.

५) खाणकाम व्यवसाय हा खनिजांच्या नैसर्गिक उपलब्धतेवर अवलंबून असतो हे स्पष्ट करा.

६) प्राथमिक आर्थिक व्यवसायांची वैशिष्ट्ये विस्ताराने लिहा.

**प्र.७. जगाच्या नकाशा आराखड्यामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या साहाय्याने दाखवून सूची तयार करा.**

१) डॉगर बँक मत्स्यक्षेत्र

२) आशिया खंडातील वनकटाईचे क्षेत्र

३) ऑस्ट्रेलियातील पशुपालन क्षेत्र

४) युरोपमधील शेतीखालील क्षेत्र

५) अरबी समुद्रातील खाणकाम क्षेत्र

६) नैर्ऋत्य अटलांटिकमधील मासेमारी क्षेत्र

प्र.८. शेती व्यवसायात खंडनिहाय गुंतलेल्या लोकसंख्येची २०१८ सालची आकडेवारी खालील तक्त्यात दिलेली आहे. त्या आधारे सुयोग्य आलेख काढून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

| खंड | प्राथमिक व्यवसायात गुंतलेली लोकसंख्येची टक्केवारी (सन २०१८) |
|---|---|
| युरोप | ७.९१ |
| आशिया | २४.४९ |
| उत्तर अमेरिका | १४.९३ |
| दक्षिण अमेरिका | १४.९४ |
| आफ्रिका | ४७.२८ |
| ऑस्ट्रेलिया | २७.७९ |

संदर्भ स्रोत : FAO – २०१८

१) कोणत्या खंडात १०% पेक्षा कमी लोकसंख्या शेती व्यवसायामध्ये कार्यरत आहे?

२) कोणत्या खंडात ४०% पेक्षा जास्त लोकसंख्या शेती व्यवसायामध्ये कार्यरत आहे?

३) दिलेल्या आकडेवारीकडे बघता, या खंडांना तिथल्या आर्थिक विकासाच्या स्तरानुसार चढत्या क्रमाने लावता येईल काय?

***